(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# स्त्रीवादी चळवळ

**प्रा.भुसारे मधुचंद्र लक्ष्मण**

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा, जि. जळगांव

..........................................................................................................

**प्रस्तावना:**

भारतामध्ये स्त्रीवादी चळवळीची सुरूवात खरे तर प्राचीन काळापासून सुरू झाली आहे. परदेशातील सीमॉन दि बोव्हा सारख्या स्त्रीयांनी स्त्रीवादी चळवळीचा पाया घातलेला दिसतो. स्त्री ही आपल्या मनातील विचार, भाव-भावना निर्धास्तपणे साहित्यातून मांडू लागली, बोलू लागली व आपला हक्क मागू लागली तिथूनच खऱ्या अर्थाने स्त्रीवादी चळवळीस सुरूवात झालेली दिसते. आदिवासी, ग्रामीण, शहरी, दलित, मध्यमवर्गीय, उच्चवर्णीय या साऱ्याच वर्गातील स्त्रीया साहित्यातून व्यक्त होऊ लागल्या, ही बाब खऱ्या अर्थाने पुरूषसत्ताक पद्धतीला जबरदस्त धक्का देणारी ठरली. संत कान्होपात्रा, संत जनाबाई यांच्या अभंगातून त्या आपल्या मनातील भाव निर्भिडपणे व्यक्त करतात. म्हणूनच प्राचीन काळातील संत साहित्यापासून स्त्रीवादी चळवळीची पायाभरणी झालेली दिसते, असे म्हणता येईल.

**विषय विवेचन:**

आजच्या आधुनिक काळात मोठ्या प्रमाणावर स्त्री कादंबरीकार, स्त्री नाटककार, स्त्री कथाकार व स्त्री कवयित्री, स्त्री नाटककार, स्त्री कथाकार व स्त्री कवयित्री लेखन करीत आहेत. त्यांचे लेखन मोठे सामर्थ्यशाली व पुरूषसत्ताक पद्धतीला धक्का देणार आहे. ताराबाई शिंदे यांचा 'स्त्री-पुरूष तुलना' हा ग्रंथ याबाबतीत महत्वपूर्ण ठरतो. आज सभोवताली पाहिल्यास आसावरी काकडे, शांता शेळके, इंदिरा संत, विजया राजाध्यक्ष, नीरजा अशा कितीतरी लेखिका मोठ्या ताकदीने लेखन करीत आहेत. त्यांच्या साहित्यामध्ये पुरूषी अहंकाराला तडा देण्याची जबरदस्त ताकद दिसते. पुरूषांच्या तोडीस तोड हे साहित्य स्त्री वर्गाच्या सन्मानाची, न्यायाची मागणी करतांना दिसते.

'नवसा भिलीणीचा एल्गार' या कथासंग्रहात नजुबाई गावित यांनी आदिवासी स्त्रीयांचे जीवन चित्रीत केले आहे. स्वत: कार्यकर्त्या असल्याने त्यांनी समाज्याचे वास्तव चित्र रेखाटले आहे. यात अंधश्रद्धेच्या पोटी एखाद्या आदिवासी स्त्रीला किती भयंकर संकटांना सामोरे जावे लागते याचे वर्णन त्यांनी निर्भिडपणे 'जवानी मा किसबीण, धयडपणमा डाकीन' या कथेतून रेखाटले आहे. यातील तानकूबाई स्वत:चे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी धडपडते. असीच धडपड 'जानकीची सीता' या कथेत दिसते. उर्मिला शिरूर यांच्या 'लाव्हा' कथेतील नायिका हेटाळणीमुळे आत्महत्या करते. सानिया यांच्या 'पूल' कथेतील नायिका तोच मार्ग निवडते. आशा बगे यांच्या 'मारवा' कथासंग्रहात स्त्री दु:खाची जाणीव स्त्रीलाच होते. असा भाव व्यक्त केला आहे. आजच्या स्त्रीवादी साहित्यातून जाणीवा निणीवा सशक्तपणे आविष्कृत होतांना जाणवतात. विभावरी शिरूरकर, गौरी देशपांडे, अंबिका सरकार, मल्लिका अमरशेख, ज्योती म्हापसेकर, उर्मिला पवार, हिरा बनसोडे या सर्व स्त्री लेखिकांनी स्त्री प्रश्नांचे व्यापक दृष्टीने चित्रण केले आहे. स्त्रीवादी चळवळीमध्ये 'समाजाच्या संस्कृती संरचनेत स्त्रियांना दुय्यमत्व का? आणि कसे आले? स्त्रीयांच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनातील प्रश्नांकडे कोणत्या अंगाने पाहिले जाते? स्त्री पुरूष नातेसंबंधाविषयी पुरूषाचे आकलन कसे आहे? बदलत्या कौटुंबिक प्रश्नाचा वेध स्त्रीवादी साहित्यिकांनी किती सखोलपणे घेतला आहे. त्यांच्या साहित्यातून नवे प्रश्न उभे केले जात आहेत का? केले जात असतील तर आजच्या स्त्रियांचे प्रश्न काय आहेत? कसे संपुष्टात येईल. यासाठी कोणती आव्हाने स्वीकारावी लागतील?'[१] इत्यादी प्रश्न स्त्रीवादी चळवळीच्या अनुषंगाने अभ्यासले जातात. यादृष्टीने साहित्याचे लेखन सध्या स्त्री लेखिका करतांना दिसून येतता. स्त्री एक माणूस आहे याकडे स्त्री लेखनाचा रोख दिसतो. स्त्रीवादी साहित्यातून स्त्रीच्या स्वत्वाची भाषा, वाङ्मयाविष्काराची नवशैली घडविण्याचा प्रयत्न केला जातो. 'स्त्रीवादी साहित्य हे स्त्रीजीवनावर भाष्य करणारे साहित्य आहे. भांडवलशाही व्यवस्थेत स्त्रीदेहाच्या बाजारीकरणातून वाढत गेलेली मोकाट भोगवादी प्रवृत्तीही स्त्री-शोषणास कारणीभूत ठरलेली आहे'[२]. आजच्या स्त्रीवादी साहित्यातून स्त्री एक माणूसपणाचा शोध होतो. स्त्री प्रश्न व तिच्या अमर्याद समस्यांचा प्रकर्षाने विचार यात मांडला जातांना दिसतो.

'जातं ओढताना देते मनगट तोलुनी
मातेचं दुध प्याले नाही घेतलं बोलूनी'[३]

या आदिवासी जात्यावरल्या ओव्यांमधूनी स्त्रीचे कष्टमय जीवन व्यक्त केले असून ती आपले मन कणखर असल्याचेही अभिमानाने व्यक्त करते. म्हणजेच यावरून स्त्रीवादी साहित्याची चळवळ ही मौखिक साहित्यातून प्रतीत होतांना दिसते. कार्ल मार्क्सने म्हटले आहे की, 'सामाजिक संस्कृतीचे एक यमक समाजातील स्त्रियांची स्थिती हे आहे याप्रमाणे पाहिले तर स्त्रीजातीची स्थिती गुलामापेक्षा विशेष सुधारलेली नाही'[४] यावरून स्त्रीच्या जगण्याची विदारक सत्यता प्राचीन काळापासून सुरूच आहे असे दिसते.

१९६० नंतर स्त्री कथाकारांमध्ये आशा बगे या आगळेवेगळे लेखन करणाऱ्या लेखिका आहेत. त्यांनी परंपरा, धर्म, रूढी, पुरूषीदास्य यातून 'स्त्रीला' सोडविण्याचे काम आगरकर, फुले व लोकहितवादी यांच्या विचारांचे अनुकरण करून विचारांनी प्रेरित होऊन केलेले आहे. आपल्या हक्कासाठी स्त्रियांनी पुढे येऊन लढले पाहिजे, हेच जणू आशा बगे अप्रत्यक्षपणे सांगतात'[५]. त्यांच्या अनेक कथांमधून स्त्री जीवनाचे चिंतन आहे त्याच बरोबर स्त्रीला अप्रत्यक्षपणे हक्काची जाणीव करून देण्याची भूमिका दिसते. आशा बगे यांच्या कथांमध्ये संस्कारशील व विचारी न्याय, हक्कासाठी लढणारी स्त्री दिसते. स्त्रियांना पुरूषांप्रमाणे समान दर्जा प्राप्त होऊ लागला याची जाणीव त्यांच्या साहित्यातून दिसते. कुटूंब व परंपरा यामधील स्त्रीची भूमिका आशा बगे तसेच इतर स्त्रीवादी लेखिकांनी केलेली दिसते. स्त्रीच्या मनाची गुंतागुंत, मानसिक आंदोलने, विद्रोह, मनातील घुसमट, भावनिक आंदोलने यांचे चित्रण दिसते. यामुळे स्त्री चळवळीची भूमिका जोरकसपणे उतरू लागलेली आहे असे म्हणता येईल.

**निष्कर्ष:**

१) भारतीय साहित्यातील स्त्रीवादी चळवळ ही प्राचीन काळापासून तसेच मौखिक साहित्यातून रूजलेली जाणवते.

२) स्त्रीवादी चळवळ 'माणूसपणाची' व स्त्री-पुरूष समानतेची मागणी करते.

३) स्त्रीवादी चळवळ न्याय हक्कासाठी संघर्ष करतांना दिसते.

४) स्त्रीवादी चळवळीने प्रेरित साहित्य स्त्री संघर्ष, स्त्री मनाची आंदोलने, स्त्री जाणिवा व्यक्त करणारे ठरते.

५) स्त्रीवादी चळवळ व यातून प्रेरित झालेले दारिद्र्य स्वत्व शोधण्याचा प्रयत्न करतांना दिसते.

**संदर्भ ग्रंथसूची:**

१. डॉ.खैरनार अशोक,डॉ.बच्छाव विजय, डॉ.पाटील किशोर, डॉ. बोरसे प्रविण, समकालीन भारतीय साहित्य आणि भाषा, अथर्व पब्लिकेशन्स, जळगांव, प्रथमावृत्ती १३ मार्च २०१६., पृ.क्र.९८

२. तत्रैव

३. डॉ.रोंगटे तुकाराम, आदिवासी साहित्य: चिंतन आणि चिकित्सा, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. शनिवार पेठ, पुणे, प्रथमावृत्ती, २६ जानेवारी २०१४, प्रकाशन क्र. २०९१, पृ.क्र.१११

४. संपा.डॉ.काळे पुरूषोत्तम, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, अंक क्र. ३६३, एप्रिल ते सप्टेंबर २०१८, पृ.क.४९.

५. संपा.प्रा.डॉ.त्रिभुवन शैलेश विश्वनाथ, त्रैमासिक सक्षम समीक्षा, वर्ष ३ रे अंक दुसरा, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१३, शब्दाली प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ४९